# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

r: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे

क्रमांक: २अ/एडीएम/२०१४/ ३२६

दिनांक : - 3 MAR 2015

सर्व सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत मुदतवाढ.....

संदर्भ :१. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१३/ प्र क्र १९१/ तांशि ४, दि.२२.५.२०१४
२.संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०१४/१८११ दि. २८.१०.२०१४
३. संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१४/४१,दि. ८.१.२०१५
४. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१५/प्र क्र ४३/तांशि-४, दि. १६.२.२०१५
५. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०१३/ प्र क्र ३५४/ भाग-२/ २०१३/१६-ब, दि. २१.२.२०१५

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र / हॉटेल मॅनेजमेट आणि कॅटेरिंग टेक्नॉलॉजी , एमबीए/एमएमएस/पीजीडीएम/ पीजीडीबीएम इत्यादी सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी , पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाच्या सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या जात प्रमाणपत्राआधारे **जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या अधीन राहून व तशा आशयाचे हमीपत्र (Proforma H) सादर केल्यानंतर** त्यांच्या मागास प्रवर्गात प्रवेश करण्याचे आदेश संदर्भाधीन दिनांक २२.५.२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेले होते. त्यानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी **दिनांक ३०.११.२०१४ पर्यंतची** परवानगी दिलेली होती. परिणामी संचालनालयाच्या संदर्भाधीन दिनांक २८.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी जात वैधता नसल्यामुळे प्रोफॉर्मा एच सादर करून प्रवेश निश्चित केलेला आहे अशा उमेदवारांचे प्रवेश दिनांक ३०.११.२०१४ पर्यंत रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येऊ नये असे कळविण्यात आलेले होते.

शासनाने दिलेली मुदत संपुष्टात आल्यामुळे व व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय उमेदवारांपैकी जे उमेदवार जात वैधता प्रमाणपत्र ३०.११.२०१४ पर्यंत सादर करू शकलेले नाहीत अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्याबाबत कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबतच्या कारणे दाखवा नोटीस सर्व उमेदवारांना देण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन दिनांक ८.१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

दरम्यान संदर्भाधीन दिनांक १६.२.२०१५ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र प्रमाणपत्र सादर करण्यास दिनांक ३१ मार्च,२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच संदर्भाधीन दिनांक २१.२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतूदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थांमधील

D:\Budage\2014-15\Gen Correspondeace\Notice of cancell admission for non submission of validity.docx

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 1504
दिनांक - 3 MAR 2015

(2)

प्रवेशाकरिता मा.उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही निर्धारीत केलेली आहे. या निर्णयातील तरतूद " क " नुसार मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ नोव्हेंबर २०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबाधित राहतील असे स्पष्ट केलेले आहे. तसेच तरतूद "इ" नुसार दिनांक १४ नोव्हेंबर २०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असेल्या आरक्षणाच्या आधारे,शैक्षणिक संस्थेत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना व शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र , नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधित विभागांनी करावी अशी तरतूद आहे.

शासनाच्या वरील संदर्भाधीन दिनांक १६.२.२०१५ व २१.२.२०१५ रोजीच्या आदेशानुसार आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेशित झालेल्या मागास विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र व नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक ३१.३.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर बाब विचारात घेऊन आपल्या अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. आणि सदर बाब आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांनाही अवगत करण्यात यावी. (सोबत शासन पत्र व शासन निर्णयाची प्रत जोडली आहे)

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तशिसं/प्राकाना/शैवि—३/जावैप्र/२०१५/ 658
दिनांक : - 4 MAR 2015

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व शासकीय, अनुदानित विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था
नागपूर विभाग, नागपू

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.

③

# महाराष्ट्र शासन

क्रमांक-संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४३/तांशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई—४०० ०३२
दिनांक- १६ फेब्रुवारी,२०१५

प्रति,

संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय :-व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत...
संदर्भ :- आपले पत्र क्र. २अ/एडीएम/२०१४/१९८३, दि. २१/११/२०१४ व सहपत्रे

व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांवर प्रवेश घेतेवेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. शासनाच्या दि. २२/०५/२०१४ च्या पत्रान्वये दिलेल्या आदेशानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी कागदपत्रे पडताळणीवेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असल्याची अट तूर्तास शिथील करण्यात आली असून मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी त्यांना शासनाच्या सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या जात प्रमाणपत्राच्या आधारे व प्रवेश घेतल्यापासून ३ महिन्यांच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्याच्या अधीन राहून व तशा आशयाचे हमीपत्र (Proforma-H) सादर करुन त्यांचा मागास प्रवर्गात प्रवेश निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार या विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रवेश फेरीमार्फत प्रवेश झाल्यानंतर ३ महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील, अशी अधिसूचना यापूर्वी दि. २३/०५/२०१४ रोजी प्रसिध्द केली होती.

२. यानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी जात वैधता नसल्यामुळे प्रोफॉर्मा एच सादर करुन प्रवेश निश्चित केला आहे. अशा उमेदवारांचे प्रवेश दिनांक ३०/११/२०१४ पर्यंत रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येऊ नये असेही आपल्या दि. २८/१०/२०१४ च्या परिपत्रकान्वये जाहिर केले आहे.

पत्र प्राप्त झाले
26 FEB
स्वागत लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आ- ४९९२
२३/२/२०१५

३.	तथापि, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक १. नाशिक यांनी दि. २७/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये सदर मुदत ३०/११/२०१४ च्या ऐवजी किमान ३१ जानेवारी, २०१५ अशी करण्यात यावी, अशी विनंती आपणास केली आहे. सदर समितीत अध्यक्ष व संशोधन अधिकारी ही दोन्ही पदे रिक्त असून या दोन्ही पदांचा अतिरिक्त कार्यभार व ते अधिकारी त्यांचा नियमित कार्यभार सांभाळून या समितीचे कामकाज करीत आहेत. अहमदनगर व नाशिक या दोन्ही जिल्हयांच्या व्यावसायिक अभ्यासक्रमात असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळपास २०,००० इतकी आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे ४००० प्रस्ताव वरील समितीकडे ऑक्टोबर, २०१४ अखेरीस प्रलंबित आहेत. हे प्रस्ताव समितीकडे विलंबाने प्राप्त झालेले आहेत. तथापि, या विद्यार्थ्यांनाही वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत दि. ३०/११/२०१४ पर्यंत दिली आहे.

४.	व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या ज्या मागासवर्गीय उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही अशा उमेदवारांना उपरोक्त शासन आदेशानुसार प्रवेशानंतर ३ महिन्यांचे आत (दि. ३० नोव्हेंबर, २०१४ पर्यंत) जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून प्रवेश देण्यात आला आहे. मात्र जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून सदर मुदत वाढविण्याची विनंती प्राप्त झाली आहे ही बाब विचारात घेता अद्यापही काही मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेली नाहीत. या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत आवश्यक ते आदेश निर्गमित करण्याची विनंती आपण शासनास संदर्भाधिन पत्रान्वये केली आहे.

५.	वास्तविक विद्यार्थी इयत्ता ११ वी व १२वी विज्ञान शाखत शिकत असताना मागास प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांची जात प्रमाणपत्रे संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यामार्फत एकत्रितपणे पडताळणीसाठी पाठविण्यात येतात. या जात प्रमाणपत्रांची पडताळणी करुन जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी समितीकडे दीड ते दोन वर्षांचा कालावधी असतो या कालावधीत वैधता प्रमाणपत्र मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेताना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची अडचण येऊ नये. तथापि, काही व्यावसायिक अभ्यासक्रम जसे की, एम.बी.ए./एम.एम.एस., आर्किटेक्चर, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांना विज्ञानेतर (आर्टस, कॉमर्स इ.) शाखेतील विद्यार्थी देखील प्रवेश

घेऊ शकतात. आर्टस्, कॉमर्स शाखेतील मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ते इयत्ता ११वी / १२वी मध्ये शिकत असताना जात प्रमाणपत्र पडताळणी करुन घेण्याची तरतूद नाही, अशा विद्यार्थ्यांकडे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतेवेळी साहजिकच जात वैधता प्रमाणपत्र नसते व हया विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र प्रवेश घेतल्यानंतर संबंधित महाविद्यालयांमार्फत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविण्यात येते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ देणे आवश्यक ठरते.

६. व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतेवेळी मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांवर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळावा व त्यादृष्टीने या विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र तपासून प्रवेश निश्चित करणे नियमानुसार आवश्यक आहे. जेणेकरुन या आरक्षित जागांवर बोगस विद्यार्थी प्रवेशित होणार नाहीत व खऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर अन्याय होणार नाही, ही शासनाची भूमिका आहे. परंतू वर नमूद केलेल्या कारणांस्तव जात वैधता प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नाहीत, म्हणून ही प्रमाणपत्रे सादर करण्यास वारंवार मुदतवाढ देण्याची आवश्यकता भासते.

७. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये मराठा आरक्षणाअंतर्गत जे प्रवेश झाले आहेत व ज्यांना मा. उच्च न्यायालयाने संरक्षित केले आहे त्यांनाही जात वैधता प्रमाणपत्र/ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ लागू करण्यात यावी. तसेच अशा विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र/ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अद्याप दिली गेली नसल्यास ती विनाविलंब देण्यात यावीत.

८. सदर वस्तूस्थिती विचारात घेता आपण विनंती केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र सादर करण्यास दि. ३१ मार्च, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्याप्रमाणे आपण आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

(म. मा. मोरवे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत सादर अग्रेषित :-

प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटयूट (बार्टी), क्विन्स गार्डन, पुणे १
निवडनस्ती -- तांशि-४